(७) **संगणक अर्हता :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९/०३/२००३ मधील तरतुदीनुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C.किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS- CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ व शासन पूरकपत्र क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९, दिनांक ०८/०१/२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता असणे बंधनकारक आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१ दिनांक १९ मार्च, २००३ अन्वये संगणक अर्हता सेवेत प्रवेश केल्यापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक आहे.

(८) **नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

८.१ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तथापि शासन परिपत्रक क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का-३६ दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार अर्ज करण्यासाठी पात्र राहतील.

८.२ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. मात्र, मराठी व हिंदी विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा वा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार प्रचलित तरतूदीनुसार उपरोक्त परीक्षेतून उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्यास पात्र राहतील.

८.३ विहित वयोमर्यादितील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने भरावेत. अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

(९) **परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम :-**

**संगणक आधारित परीक्षा :-**

| अ.क्र. | विषय | भाषा | स्तर | प्रश्नसंख्या | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | मराठी | १२ वी | ५० | ५० |
| २ | इंग्रजी | इंग्रजी | १२ वी | ५० | ५० |
| ३ | सामान्यज्ञान | इंग्रजी व मराठी | पदवी | ५० | ५० |
| ४ | बुध्दिमापन चाचणी (Logical Ability/ Reasoning Intelligence) | इंग्रजी व मराठी | पदवी | ५० | ५० |

अभ्यासक्रम :-

| Post Name - Junior Clerk | |
|---|---|
| 1 | **Section name - English** |
| | similar words, opposite words, common vocabulary, sentence structure, grammar, use of idioms & phrases & their meaning & comprehension of passage. (Std.12th Level) |
| 2. | **Section name- Marathi** |
| | समानार्थी शब्द, विरूध्दार्थी, शब्द, सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना , व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच, उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे (इ. १२ वी स्तर) |
| 3. | **Section Name- General Knowledge** |
| | चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषत: महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा भूगोल, भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राज्यव्यवस्था तसेच पर्यावरण (पदवी स्तर) |
| 4. | **Section name- Logical Ability/ Reasoning Intelligence** |
| | उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो?, हे अजमावण्यासाठीचे प्रश्न (पदवी स्तर) |

(१०) ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-

ऑनलाईन परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. उपरोक्त पदांची ऑनलाईन परीक्षा, पदासंबंधीची शैक्षणिक अर्हता, पदासाठी आवश्यक तांत्रिक ज्ञान, इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्यज्ञान आणि बुध्दिमत्ता चाचणी व तत्सम बाबी यावर आधारित असेल.

(११) परीक्षा शुल्क :-

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ लिपिक | रू.५५०/- | रू.३५०/- |

टीप :- माजी सैनिक यांना परीक्षा शुल्क आकारण्यापासून सूट देण्यात येत आहे.

११.१ परीक्षा शुल्क भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहे. (क्रेडिटकार्ड/डेबिट कार्ड/भीम युपीआय/इंटरनेट बॅंकिंग इत्यादीद्वारे)